Vol 6 Issue 5 Nov 2016

ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# *Golden Research Thoughts*

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

## Welcome to GRT

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.


## Regional Editor

Dr. T. Manichander

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University


**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

ISSN: 2231-5063 Impact Factor :4.6052(UIF) Volume - 6 | Issue - 5 | November - 2016

GRT Golden Research Thoughts

# संत तुकाराम आणि संत कबीर यांच्या अभंगातील जातीय - धर्मभेदावरील साम्यविचार

प्राचार्या डॉ. वैशाली सू. रोकडे
क्रा. व. ना. नाईक शि. प्र. संस्थेचे कला आणि वाणिज्य महाविद्यालय दिंडोरी
जि. नाशिक .

संत तुकारामांचा जन्म इ. स. 1608 मध्ये पुण्याजवळच्या इंद्रायणी काठच्या देहू या लहानश्या खेडयात झाला. तुकारामांचे घराणे मोरे प्रतिष्ठित होते. ते जातीने कुणवी होते. त्यांच्या शेतात स्वमालकीचे जुने विठ्ठलाचे देऊळ होते. लहानपणापासून कुटुंबाचे वातावरण भक्तीमय होते.

महाराष्ट्र हा उत्तर व दक्षिण भारताला जोडणारा दुवा आहे. म्हणूच असे म्हटले जाते की उत्तर भारताची सांस्कृतिक व दक्षिण भारताची सांस्कृतिक आणि अध्यात्मिक विचारांचा प्रभाव कळत न कळत महाराष्ट्रातील संतांवर पडलेला दिसतो. दक्षिणेतील संत तुकाराम व उत्तरेतील संत कबीर या दोन्ही संतांच्या विचारात आणि अनुभवात विलक्षण साम्य आहे.

संत तुकारामांच्या काळात तीव्र वर्णव्यवस्था आहे. वर्ण व्यवस्थेची चौकट मानणारा ब्राम्हण मद्यमांसाच्या आहारी गेलेला त्यांना आवडत नाही. ते म्हणतात
“ महारासी शिवे कोपे ब्राम्हण तो नव्हे ” असे त्यांचे मत होते. माणसाने आपला मानव धर्म आचरावा.

“ माणूसकी हाच माणसाचा धर्म आहे. ”
“ शूध्दाशूध्द निवड कैसे|
चर्ममास भिन्न तया|
प्रायश्चित काही|
देह त्याग करीता नाही |
नातळे चांडाळ त्याचा अंतरी विटाळू |
तुका म्हणे वेद जया गती आम्ही तयाची संगती. ||”
स्वधर्माचे पालन कितीही कठिण असले तरी ते केलेच पाहिजे. स्वधर्म म्हणजे वर्णाश्रमधर्म.

संत तुकाराम शूद्र वंशात जन्मले असल्यामुळे शुद्राला गुरूचे स्थान देण्यात येऊ नये अशी एक विचार धारा त्या काळात होती. यासंदर्भात तुकारामांचे समकालिन संत रामदास यांनी जी मते व्यक्त केली आहेत ती या प्रश्नावर प्रकाश टाकणारी आहेत.

“ नीच प्राणी गुरूत्व पावला | तेथे आचारचि बुडाला|
वेदशास्त्र ब्रम्हणाला | कोण पुसे | ”
(दासबोधद. 14 स 7-19)

नीच याती कडे गुरूत्व आले याची ही खंत आहे. सर्वांकडे समभावनेने पाहणारया परमेश्वराने उच्च नीचता जन्मावर कशी काय अवलंबून ठेवली याचे त्यांनी आश्चर्य व्यक्त केले आहे.

तुकाराम सांगतात की “ ब्रम्हण. क्षत्रिय. वैश्य. शूद्र | चांडाळही अधिकार |
बाळे नर नारी| आदि करून ही वेश्याही |
तुका म्हणे अनुभवे | आम्हा पहियले ठावे. |”

तुकाराम म्हणतात की भक्ती करतांना आपली जात पात सोडण्याचे कारण नाही.

संत कबीरांच्या चरित्र व साहित्यविषयी अनेक विदवानांनी संशोधनात्मक लेखन केले आहे. या विदवानांमध्ये डॉ. पीताम्बरदत्त बडथ्वाल, बाबू श्यामसुंदरदास, डॉ. हजारी प्रसाद व्दिवेदी डॉ. रामकुमार वर्मा इ.

“ संत कबीरांच्या चरित्राविषयी ऐतिहासिक सामगी फारशी उपलब्ध नाही. संतपरंपरा भक्तपरंपरा आणि कबीरपंथी साहित्यातून त्यांच्या चरित्राविषयी माहिती उपलब्ध होते. ”[1].

संत कबीर म्हणतात परमेश्वराचे नामस्मरण करतांना मन जर कामात नसेल तर त्याचा काय उपयोग ?

“ माला तो कर मै फिरें जीभ फिरै मुंहमाहि|
मनुवा तो दंहु दिसि फिरै यह तो सुमिरन नाहि|
”

हातात माळा घेऊन चंचल मनाने जप करणारया साधकाला संत कबीर सांगतात की माळेच्या मण्यापेक्षा मनाचे मनी ओढ. भगवंतावर प्रेम कर. हदयाची गाठ सोडव. ” 'गाठी हिरदाकी खोई' तरच तुला परमेश्वर भेटेल केवळ माळ घातल्याने परमेश्वर भेटला असता तर रहाटयाच्या गळयात माळ आहेच की. माळा ओढण्यात युगे लोटली पण अजून मनातील पापे गेली नाहित.

संत कबीरांच्या काळात असलेल्या बाहमांडबर अंधःविश्वास व ढोंगावर कठोर शब्दात टीका करून समाजाचे प्रबोधन केले. संत कबीरांनी मनाच्या शुध्दतेवर भर दिला. जोपर्यंत मन निर्मळ होणार नाही तोपर्यंत ईश्वर भेटणार नाही. एकदा मन गंगाजलाप्रमाणे झालेकी परमेश्वर तुमच्या पाठीमागे धावत येईल.

“ कबीरा मन निरमल भया जैसा गंगानीर|
पाछैं लागौ हरि फिरहि कहत कबीर कबीर......|

कबीर पंडिताला विचारतात की तू अर्थ न जाणता वेद पुराणाक्तचे पठण करतोस. ते पठण गाढवाच्या पाठीवर ठेवलेल्या चंदनाच्या भाराप्रमाणे आहे.

“ तू राम न जपहि अभागी|
वेद पुरान पढत असे पांडे खर चंदन जैसा



भारा|"

पुस्तकी विदयेपेक्षा अनुभूतीला महत्व देतात . ते पंडिताला विचारतात की तू अर्थ न जाणता वेद पुराणाचे पठण करतोस ते पठण गाढवाच्या पाठीवर ठेवलेल्या चंदनाच्या भाराप्रमाणे आहे . रामनामाचे रहस्य तुला कळले नाही .

" पोथी पढि पढि जग मुख्ा पंडित भया न कोय|
ढाई अच्छर प्रेम का पढा सो पंडित होय| "

पुस्तकी ज्ञानाच्या मागे न लागता प्रभू प्रेमाचा अनुभव घ्या . संत कवीरांच्या दृष्टिने पंडित तो की जो प्रेमाचे अडीच अक्षर आत्मसात करतो . म्हणूनच संत तुकाराम आणि संत कबीर यांच्या साम्य विचांराबाबत डॉ . सदानंद मोरे म्हणतात " तुकाराम आणि कबीर या संतााच्या मोठेपणाविषयी वेगळे काही सांगायची गरज नाही . ज्यांची तुलना करावयाची ती माणसे तोलामोलाची असावी लागतात . या दृष्टिने विचार केला तर डॉ . भिंगारकरांची निवड योग्यच आहे . "[2]

संत कवीरांनी हिंदु मुसलमान ऐक्याचा खूप प्रयत्न केला दोघांनाही एकाच परमेश्वराने निर्माण केले आहेत . हिंदु मुसलमान हे दोनही धर्म खोटे आहेत .

" भूला भरमि परै| जिनि कोई|
हिंदु तुरक झूठ फुल दोई |"

प्रत्येकाने फक्त रामनाम घेतले पाहिजे .

" कहै कवीर एक राम जप हु रे|
हिंदु तुरक न कोई| "

राम़ रहीम़ केशव़ अल्ला़ परमेश्वर ही सर्व एका परमात्माचीच नावे आहेत .
जातिभेदाचा़ धर्मभेदाचा आधारच खंडित करण्यासाठी ते ब्राम्हणाला आणि तुर्काला एकाचवेळी व्यंग्यात्मक शैलीत प्रश्न विचारतात .

" एक ज्योति से सब उत्पन्न|
कौन ब्राम्हण कौन सुदा|"

कवीर कुणास हीन म्हणत नाहित . जातिभेद नष्ट करण्यासाठी संत कवीर आणखी एक तर्क देतात . की आमच्यात आणि तुमच्यात एकच रक्त आहे . एकच प्राण आहे .

" हमतुम माहै एकै लेहू | एकै प्राण जीवन है मोहू" संत कवीर साधूची कधी जात पाहू नका त्याचे ज्ञान पहा " जाति न पूछो साधू की पूछं लिजिये ज्ञान|"

कवीर संतांच्या जातीविषयी सांगतात की मी हिंदु नाही आणि मुसलमान पण नाही . मी एक पंचमहाभूतापासून बनलेला पुतळा आहे आणि त्यात ईश्वरी चैतन्य खेळत आहे .

" हिंदू कहौं तो मै नही मुसलमान भी नाही ऽ पांच तत्वोंका पुतला|गैवी खेले मांहि"|

त्यावेळचे पांडे पंडित अज्ञानी होते . पैसा कमविणे हेच त्यांचे ध्येय होते . लोकांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन ते लोकांना लुबाडीत असत . संत कवीर परोपरीने लोकांमध्ये पसरलेली घोर अंधविश्वास दुर करण्याचा प्रयत्न करीत होते . ढोंगावर कठोर प्रहार करीत होते . पण तत्कालिन समाज सुधारायला तयार नव्हता याप्रमाणे कवीरांनी जाती भेद व धर्म भेदाचे खंडन केले . आणि म्हणून मराठी संतांबरोबरच हिंदी संतानी देखिल लोकांना प्रबोधन करण्याचे काम केले . याबाबत डॉ . भालचंद्र नेमाडे म्हणतात " तुकाराम जसा भक्ती मार्गा तला थोर पथदर्शक आहे आणि संत म्हणून त्याचे कतृत्व दैदीपयमान आहे तसाच तो एक असामान्य कवी म्हणूनही अजरामर आहे . गेली साडेतीनशे वर्षे मराठी भाषीकांच्या धार्मीक आणि सामाजिक विचारांवर तुकारामाचा विलक्षण प्रभाव पडला आहे . दूरदूर पसरलेल्या खेदयापाडयात तुकारामांचा अभंग एकू येतो . ...कवीऱशंकरदेवऱतुलसीदासऱवेमऩशाह लतिफ किंवा गालिब हे आपापल्या भाषांशी चिरंतन जोडले गेले आहेतऱत्याचप्रमाणे तुकाराम मराठी मनाचा चिरंतन अविष्कार आहे . "[3]

संत तुकाराम आणि संत कवीर यांनी धर्मविषयक संकल्पना स्पष्ट केली आहे . धर्म़ भक्ती ज्ञाऩ योग या कोणत्याही मार्गावरून अध्यात्मिक प्रवास करणारया प्रत्येक साधकाला धर्माचे नियम पाळणे आवश्यक आहेत .

"धर्माचे पाळण| करणे पाषांड खंडन||
हेचि आम्हा करणे काम| बीज वाढवावे नाम ||"
तीक्ष्ण उत्तरे हातीं घेऊनि बाण फिरे||
नाही भीडभार| तुका म्हणे साना थोर||"
(सं . तु . अं . गा . 2136)

" मोहि आज्ञा देई दयाल | दया करि कांहू समझाई |
कहै कबीर मैं कहि कहि हारयों | अब मोहि दोष न लाई | "
( क . ग्रं . प्र . 196)

"धर्माची आणखीही काही रूपे आहेत . उदा . राजधर्म पुत्रधर्म पितृधर्म गृहास्थधर्म मानवधर्म सर्व धर्मात मानवधर्म श्रेष्ठ आहे . प्रत्येक मानवात परमेश्वर आहे . असे समजून त्याच्याशी वागणे हा मानवधर्म झाला आणि हा मानवधर्माचा प्रचारच संत तुकाराम व संत कबीर यांनी केला ."[4]

संत तुकारामांच्या ठिकाणी विश्वकल्याणाची भावना साकारलेली होती . तुकारामांची ठायी जाती धर्म लिंगगरीर्ब श्रीमंत असा कोणताच भेद मानला नाही . रूढी परंपरा ढोंग पाखंड यांचा तीव्र निषेध केला . समाजात विरोध पत्तकरावा लागला . त्यांनी निर्भिडपणे समाजाला मार्गदर्शन केले .

"आम्ही वैंकुठवासी आलो याचि कारणासी |
भोलिले जे मुखी साच भावे वर्तावया | "

आपल्या अवतार कार्याचे स्वरूप संत तुकारामांनी स्पष्ट केले .

" मऊ मेणाहून आम्ही विष्णुदास |
कठिण वज्रास भेंदू ऐसे |
मायबापाहूनिबहु मायावंतऽ करू घातपात शत्रूहुनि |
तुका म्हणे आम्ही अवघेचि गोडऽ ज्याचे पुरे कोड त्याचे परि | "

तुकाराम म्हणतात की आम्ही विष्णुदास मायबापाहून प्रेमळ आहोत . पण नाठाळांच्या बाबतीत शत्रूहूनही कठोर आहोत . आमच्या कमरेची लगोंटी मागितली तरी देऊ पण नाठाळ दांभिकांच्या माथी काठी मारण्यास आम्ही मागेपुढे पाहणार नाहीत . आम्ही जितके मऊ तितके कठोर .

" धर्माचे पाळण | करणे पापांड खंडन |
हेंचि आम्हा करणे काम | बीज वाढवावे नाम | "
तीक्ष्ण उत्तरे हाती घेऊनी बाण फिरे |
नाही भीडमार | तुका म्हणे साना थोर | |

" कबीर काय आणि तुकोबा काय पारंपरीक समाजरचनेच्या नियमांप्रमाणे त्यांना धर्म विषयक विवेचन करण्याचा अधिकार नव्हता . परंतु प्रबळ आत्मप्रत्यय आणि लोक कल्याणविषयीची आस्था यांच्या बळावर त्यांनी खरया धर्माचे स्वरूप सांगणे व खोटा धर्म उघडकीस आणणे हे आपले महात्वाचे काम मानले ."[5]

खालच्या जातीत जन्म घेतल्यामुळे संत तुकाराम आणि संत कबीर दोघांनाही दुःख आणि अपमान सहन करावा लागला होता .

" धर्मअर्थकाम मोक्ष हे चार पुरूषार्थ वैदिक धर्मात मानले जातात . मोक्ष हे वैदिक धर्माचे साध्य आणि व्रतवैकल्ये हे देवतांच्या उपासनेचे परमोच्च साधन मानले जात होते . पण हया धर्माचे दारे फक्त उच्चवर्णिसाठीच खुली होती . अन्य लोकांना या धर्मात स्थान नव्हते . हया धर्माची भाषा ही त्यांच्या व्यवहारातली नव्हती . बहुसंख्य लोकांची होणारी धार्मिक आणि सामाजिक कुचंबना पााहून संत मनोमन कळवळले . त्यांना बहुसंख्यांची मानसिक गोची पहावेना . त्यामुळे सर्वत्र वैदिक धर्मातील संस्कार आणि आचार तत्वांच्या विरोधात संताचा उद्रेक सर्वसामान्यांच्या लढयाच्या रूपात उभा ठाकला . त्यासाठी अनेक प्रकारचे पंथ आणि संत भारताच्या भूमीत जन्माला आले . एकटया महाराष्ट्रातच जैन शैव वैष्णव नाथ लिंगायत महानुभाव आदी पंथ स्थापन झाले ."[6]

दोन्ही संतांनी जातिभेदामुळे उतपन्न झालेल्या सामाजिक विषमतेचा प्रत्यक्ष अनुभव घेतला होता म्हणून त्यांच्या काव्यात केलेले जातिभेदामुळे उतपन्न झालेल्या सामाजिक स्पृश्यास्पृश्यता ढोंग यांचे खंडन स्वःताच्या अनुभवावर आधारलेले दिसते . संत तुकाराम व संत कबीर यांनी समाजातील विषमता जातीभेद व धर्मभेद यावर तत्तकालिन पिडित समाजाला प्रबोधन केले . संभ्रमात असलेल्या समाजाला सन्मार्गावर आणण्याचे प्रयत्न मराठी संत तुकाराम व हिंदी संत कबीर यांनी केले . त्यांचे हे प्रबोधन अमूल्य असेच आहे .

## संदर्भग्रंथ

1 . डॉ . कृ . ज्ञा . भिंगारकर संत तुकाराम आणि संत कबीर स्नेहवर्धन प्रकाशन पुणे प्रथमावृत्ती 27 मार्च 2009 पृ . 36 आय एस . बी . एन . 89634-79-8

2 . डॉ . सदानंद मोरे प्रस्तावना डॉ . कृ . ज्ञा . भिंगारकर संत तुकाराम आणि संत कबीर स्नेहवर्धन प्रकाशन पुणे प्रथमावृत्ती 27 मार्च 2009 पृ . 36 आय . एस . बी . एन 89634-79-8

3 . भालचंद्र नेमाडेसाहित्य अकादेमीन्यू दिल्लीप्र . आ . 2007आय . एस . बी . एन . 81-260-1925-5

4 . डॉ . कृ . ज्ञा . भिंगारकर संत तुकाराम आणि संत कबीर स्नेहवर्धन प्रकाशन पुणे प्रथमावृत्ती 27 मार्च 2009 पृ . 174 आय . एस . बी . एन . 89634-79- 8

5 . डॉ . सदानंद मोरे प्रसावना डॉ . कृ . ज्ञा . भिंगारकर संत तुकाराम आणि संत कबीर स्नेहवर्धन प्रकाशन पुणे प्रथमावृत्ती 27 मार्च 2009 पृ . 10 आय . एस . बी . एन . 89634-79-8

6 . डॉ . किशोर सानप आणि प्रा . मनोज ताायडे तुकाराम व्यक्तित्व आणि कवित्व लोकवांङ्मय गृह मुंबई सातवी आवृत्ती 1 . मै . 2010 पृ . 3

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org